# महाराष्ट्र शासन

**महत्वाचे/अतितात्काळ**

**क्रमांक:-इबांका-२०१७/प्र.क्र.३७२/काम-७**
उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : १५ सप्टेंबर, २०१७.

प्रति,

कामगार आयुक्त,
कामगार भवन, ई-ब्लॉक, सी- २०,
बांद्रा- कुर्ला संकुल, बांद्रा (पूर्व),
मुंबई- ४०० ०५१.

**विषय:-** बांधकाम कामगारांचे कायद्यांतर्गत नोंदणीसाठी व लाभासाठीचे अर्ज (प्रस्ताव) नोंदणीकृत मजदूर संघटनेकडून दाखल करून घेण्याबाबत

**संदर्भ:-** आपल्या कार्यालयाचे क्र.मइवइबाकमं/शासन संदर्भ-४/२०१७, दि.२९.५.२०१७

महोदय,

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने मा. सर्वोच्च न्यायालयाने दि.१८ जानेवारी २०१८ रोजी दिलेल्या आदेशात "Registered trade unions, Legal service Authorities and NGOs are to be encouraged to assist the workers to submit applications for registration and for seeking benefits" असे अभिप्राय दिलेले आहेत. त्यास अनुसरुन आपल्या कार्यालयाकडून प्राप्त झालेल्या संदर्भाधीन प्रस्तावानुसार बांधकाम कामगारांच्या नोंदणी व लाभाचे वाटप करण्यासाठी राज्यातील नोंदणीकृत मजदूर संघटनांना मदतनीस म्हणून शासन मान्यता देण्यात येत आहे.

या संदर्भात इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाने खाली नमूद केलेल्या कार्यकक्षेत राहून काम करावे.

१. राज्यातील नोंदणीकृत मजदूर संघटनांनी मदतनीस म्हणुन सादर केलेले विहीत नमुन्यातील नोंदणी व लाभाचे अर्ज व आवश्यक ती कागदपत्रे जिल्हा कार्यालयाने स्विकारावे.
२. मदतनीस म्हणुन राज्यातील नोंदणीकृत मजदूर संघटनेकडून आवश्यक त्या कागदपत्रासह प्राप्त झालेल्या अर्जाची सखोल छाननी करावी, छाननी नंतर पात्र ठरलेल्या कामगारांना भेटीची वेळ निश्चीत करुन सक्षम अधिका-याच्या समक्ष पडताळणीसाठी बोलवण्यात यावे.
३. पडताळणीअंती सर्व बाबीची खात्री झाल्यावर बांधकाम कामगारांना ओळखपत्र वितरीत करण्यात यावे.
४. नोंदणीकृत बांधकाम कामगारांनी लाभाची मागणी केल्यास ते त्यास पात्र ठरल्यास त्यांचे देय आर्थिक लाभ DBT द्वारे त्यांच्या बँक खात्यात परस्पर जमा करण्यात यावेत.

आपला,

(दत्तात्रय य. डांगे)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन.

निर्गमित केले
दिनांक 15/9/17

प्रत :- निवडनस्ती (कामगार ७)

O/C